RCS No. ४५-2020

आर. सी. एस. ४५/२०२०
धोंडाबाई / राहुल
CNR NO. MHOS14000 १४६२०२०

**नि. क्र. ७७ खाली**

**वादी तर्फे साक्षीदार**

शपथेवर निवेदन सादर करतो की,

माझे नावः– विजयकुमार काशीद

**प्रतिवादी तर्फे उलटतपास श्री. एस. आर. काळे यांच्यामार्फत सुरु**

माझी जन्मतारीख २५.१०.१९७४ आहे. वाद मिळकतीचा पुर्वीचा सव्र्हे नंबर १८९ आहे. एकत्रीकरणानंतर त्याला ४०७ गट नंबर पडला. या जमिनीमध्ये खरेदीखत चंद्रकांतच्या नावावर नोंदविलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, या जमिनीवर चंद्रकांतचा कधीही ताबा नव्हता. हे खरे नाही की, एकत्रीकरणानंतर चंद्रकांतचे नाव त्या गटावर आले नाही. हे खरे नाही की, दावा मिळकत ही वडिलोपार्जित नाही. हे खरे आहे की, आमच्या वडिलांना किंवा आत्याला त्यांच्या वडिलांकडून आली नाही. हे खरे नाही की, या जमिनीशी आमच्या वडिलांचा व आत्याचा संबंध नाही. हे मला माहीत नाही सुरेंद्र व चंद्रकांत यांचेतील दाव्यात माझे वडिलांनी साक्ष दिली की मिळकत चंद्रकांतची आहे. त्या दाव्यात माझे वडील व आत्या यांना पक्षकार करुन घ्या म्हणून अर्ज दिला होता. हे मला माहित नाही की, तो अर्ज कोर्टाने नामंजुर केला. हे मला माहित नाही की, त्या आदेशाविरुद्ध त्यांनी अपील केले किंवा नाही. चंद्रकांत सासरवाडीला जामगांव ता. बार्शी येथे राहत होता. हे मला माहित नाही चंद्रकांत चे वारस व सुरेंद्रमध्ये त्या दाव्यात तडजोड झाली. हे मला माहित नाही की, त्या तडजोडीत चंद्रकांतचे वारसांनी असे लिहून दिले की, चंद्रकांतचा दावा मिळकतीवर ताबा नाही. माझ्या आत्याचे लग्न ४० ते ४५ वर्षापुर्वी झाले.

तेंव्हापासून ते आपल्या पतीकडे नांदतात. हे म्हणणे खरे नाही की, चंद्रकांतचे लग्न जमत नव्हते म्हणून माझे वडीलांनी जमीन घेवुन दिली. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे दावा मिळकत माझे वडीलांची व आत्याची एकत्र कुटुंबाची मिळकत आहे. मला वयाच्या २२ वर्षापासून कळायला लागले. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र आत्याच्या व वडिलांच्या सांगण्यावरुन लिहिले. हे खरे नाही की, माझे वडिलांनी व आत्यांनी खोटा दावा दाखल केला. हे खरे नाही की, त्यांच्या सांगण्यावरुन मी खोटे शपथपत्र दाखल केले आहे व आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by RAJU TUKARAM INGLE
Date: 2023.07.20 12:26:11 +0530

दिनांकः– १८.०७.२०२३

आर. टी. इंगळे
दिवाणी न्यायाधीश व. स्तर, परंडा

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F file Judgment/Order/Record and Document are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | Vaibhav Mohanrao Ingale<br>Stenographer (Grade-III) |
| Court | - | Civil Court Senior Division, Paranda. |
| Date | - | 18-07-2023 |
| Order signed by the presiding officer on | - | 18-07-2023 |
| Order uploaded on | - | 18-07-2023 |